# <u>नियमित दिवाणी दावा क्र.१५०/२०१६ मधील निशाणी क्रमांक ६२ वरील आदेश</u>

बापू शेजाळ वि. मिलींद कुलकर्णी

**CNRNO.MHSN0700012182016**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश १ नियम १० प्रमाणे व कलम १५१ प्रमाणे दाखल केला असून प्रस्तावित प्रतिवादी २ म्हणून मेघा व्यंकटेश कुलकर्णी व प्रस्तावित प्रतिवादी क्र. ३ म्हणून शोभा प्रदीप खटावकर यांना दाव्यात प्रतिवादी म्हणून समाविष्ट करण्याची विनंती केली आहे.

०२. प्रतिवादी यांनी आपल्या अर्जात असे नमूद केले आहे की, प्रस्तुतचा दावा वादी यांनी निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी अर्जात नमूद केले आहे की वादमिळकतीच्या सातबारा उता–यावर प्रस्तावित प्रतिवादी क्र २ व ३ यांचे नांवे देखील नमूद आहेत. यास्तव त्या दोघी या प्रस्तुत दाव्यातील आवश्यक पक्षकार आहेत. असे असताना वादी यांनी त्या दोघींना प्रस्तुत दाव्यामध्ये पक्षकार केलेले नाही.यास्तव प्रस्तुत अर्ज दाखल करुन प्रस्तावित प्रतिवादी क्र. २ व ३ यांना दाव्यात समाविष्ट करण्याची विनंती त्यांनी केली आहे.

०३. प्रस्तुत अर्जास वादी यांनी आपले म्हणणे अर्जाखाली नमूद करुन कथन केले आहे की प्रतिवादी यांनी वादीच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा केल्याने फक्त प्रतिवादी क्र. १ यांचेविरुध्द दावा दाखल केलेला आहे. त्यामुळे याकामी शोभा खटावकर व मेधा कुलकर्णी यांना पक्षकार करता येणार नाही. वादी यांची त्यांचेविरुध्द ताकीदीची दाद नसल्याने प्रतिवादीस प्रतिवादी म्हणून पक्षकार करता येणार नाही. केवळ दाव्याचे काम लांबणीवर टाकण्यासाठी प्रतिवादी यांनी खोटा अर्ज दिला आहे. तो कायदयानुसार चालण्यास पात्र नाही. तरी प्रतिवादीचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती त्यांनी केली आहे.

०४. अर्ज व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांचा युक्तीवाद ऐकला.

०५. प्रस्तुतचा दावा वादी यांनी निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. निरंतर ताकीदीचा अनुतोष हा जी व्यक्ती वादीला त्याच्या मिळकतीच्या उपभोगास

अडथळा निर्माण करते त्या व्यक्तीच्या विरुध्द मागता येते. वादी स्वतः कथन करीत आहेत की वादी यांना प्रस्तावित प्रतिवादी क्र. २ व३  यांच्याविरुध्द कोणताही अनुतोष मागण्याचा नाही. प्रस्तुत दावा हा निरंतर मनाईसाठी दाखल केलेला आहे. वाद मिळकतीच्या सातबारा उता-यावर ज्या व्यक्तींची नांवे आहेत त्या व्यक्ती प्रस्तुत दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार नसून वादी यांना ज्या व्यक्तीकडून अनुतोष मागायचा आहे त्याव्यक्ती या प्रस्तुत दाव्यात आवश्यक पक्षकार असतात.ज्याअर्थी वादी यांना प्रस्तावित प्रतिवादी यांच्याकडून कोणताही अनुतोष मागायचा नाही त्याअर्थी केवळ सातबारा उता-यावर प्रस्तावित प्रतिवादी यांची नांवे समाविष्ट आहेत म्हणून त्यांना प्रस्तुत दाव्यात पक्षकार करता येणार नाही.  वरील सर्व बाबी विचारात घेता प्रतिवादींचा अर्ज नामंजूर करणे न्यायोचित ठरते. सबब खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

KADAM NUTAN SACHIN
Digitally signed by KADAM NUTAN SACHIN
Date: 2026.07.08 11:43:52 +0530

(श्रीमती एन.एस.कदम)

दिनांक ०८.०७.२०२६ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर कवठेमहांकाळ

Certificate

I affirm that the contents of this P. D.F. file order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - H.P. Haridas
Court - CJJD and JMFC, Kavathemahankal.
Date -08.07.2026
Order signed by the
Presiding Officer on -08.07.2026
Order uploaded on 08.07.2026